**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान, ग्लोबल साऊथसाठी ‘महासागर’ उपक्रमाचीही घोषणा
- जास्त व्याजदर देणाऱ्या योजनांच्या आमिषाला बळी न पडण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागरिकांना आवाहन
- किरकोळ चलनफुगवट्याचा दर सात महिन्यातल्या निचांकी पातळीवर
- पाकिस्तानात बलुचिस्तान प्रांतात रेल्वे अपहरण प्रकरणी प्रवाशांची सुटका करण्याचं काम सुरूच

**आणि**

- इटलीमध्ये सुरू झालेल्या १२ व्या विशेष हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंची दोन सुवर्ण आणि दोन रजत पदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखूल यांनी त्यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ या कार्यक्रमात प्रदान केला. भारत - मॉरिशस संबंधात भरीव योगदान दिल्याबद्दल त्यांना गौरवण्यात आलं. हा सन्मान मिळवणारे प्रधानमंत्री मोदी हे पहिले भारतीय आहेत.

मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम यांच्यासोबत त्यांनी आज प्रतिनिधी स्तरावर चर्चा केली. यावेळी स्थानिक चलनात देवाण घेवाण, कर्ज पुरवठा, राजदुतांसाठी प्रशिक्षण, बंदरातल्या व्यवसायाच्या माहितीची देवाणघेवाण, आर्थिक

गुन्हे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात सहकार्य, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण यासारख्या विषयांवर ८ सामंजस्य करार दोन्ही देशात झाले. भारत आणि मॉरिशसमध्ये असलेल्या भागीदारीविषयी ते म्हणाले..

**होल्ड - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बाइट**

ग्लोबल साउथसाठी **MAHASAGAR** अर्थात **Mutual and Holistic Advancement for Security and Growth Across Regions** या उपक्रमाची घोषणा त्यांनी यावेळी केली. या अंतर्गत विकासासाठी व्यापार, शाश्वत वृद्धीसाठी क्षमता विकास, परस्पर सुरक्षा यावर भर दिला जाणार आहे. हा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी रवाना झाले.

**<><><><><>**

२०२२ ते २०२४ या तीन वर्षांत देशात डिजिटल अटकेसारख्या गुन्ह्यांमध्ये जवळपास तिपटीने वाढ झाली आहे, अशी माहिती आज राज्यसभेत गृहराज्यमंत्री बंडी संजयकुमार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली. २०२२मध्ये सुमारे ४० हजार गुन्हे नोंदवले गेले होते. त्यात ९१ कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक झाली होती. २०२४मध्ये सुमारे सव्वा लाख गुन्ह्यांची नोंद झाली. या कालावधी फसवणुकीची रक्कम २१ पटींनी वाढून सुमारे १ हजार ९३५ कोटी ५१ लाख रुपये इतकी झाल्याची माहिती त्यांनी दिली. चालू वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत १७ हजार ७१८ प्रकरणं नोंदवण्यात आली असून त्यातून २१० कोटी २१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

होळी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी गेल्या वर्षी रेल्वेनं १३ हजार ५२३ विशेष गाड्या सोडल्या होत्या अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. दुर्गापूजा,दीपावली आणि छट पूजा

यासाठी रेल्वेनं गेल्या वर्षी १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विशेष गाड्यांच्या सुमारे आठ हजार फेऱ्या आयोजित केल्या होत्या. याचा फायदा सुमारे एक कोटी ८० लाख प्रवाशांना झाला.अलीकडेच झालेल्या महाकुंभच्या वेळी रेल्वेनं १७ हजार रेल्वेगाड्या सोडल्या ,ज्याचा फायदा सुमारे ४ कोटी २४ लाख प्रवाशांना झाला,असंही वैष्णव यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तेलक्षेत्र नियमन आणि विकास दुरुस्ती विधेयक २०२४ला लोकसभेनं आज मंजुरी दिली. खनिज तेलांमध्ये कोळसा, लिग्नाइट किंवा हीलियम यांचा समावेश केला जाणार नाही असं या कायद्यात स्पष्ट करण्यात आलं आहे. ऊर्जा सुरक्षेसाठी भारताचं दीर्घकालीन धोरण वाजवी दरात परवडणारं, उपलब्धता आणि शाश्वतता या त्रिसूत्रीभोवती फिरत असून पुरवठ्यात कोणतीही कमतरता नाही असं निवेदन यावरच्या चर्चेला उत्तर देताना पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिलं.

**<><><><><>**

जास्त व्याजदर देणाऱ्या योजनांच्या आमिषाला नागरिकांनी बळी पडू नये. जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असतात, असा सावधगिरीचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

कृत्रिम किंवा भेसळीचं पनीर आरोग्यासाठी धोक्याचं असून त्याच्या विक्रेता आणि संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

जागतिक पातळीवरच्या QS मानांकनामध्ये विषयानुरुप श्रेणीमध्ये पहिल्या ५० संस्थांच्या यादीत नऊ भारतीय विद्यापीठांनी आणि संस्थांनी बाजी मारली आहे. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयात आयआयटी मुंबई २८ व्या स्थानी आहे. धनबादच्या इंडियन स्कुल ऑफ माईन्स देशात पहिल्या आणि जागतिक पातळीवर विसाव्या स्थानी आहे. आयआयटी खरगपूर, आयआयटी दिल्ली, IIM अमदाबाद, IIM बेंगळुरूसुद्धा या यादीत आहेत.

**<><><><><>**

फेब्रुवारी महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर कमी होऊन ३ पूर्णांक ६१ शतांश टक्क्यांवर आला. सात महिन्यातली ही निचांकी पातळी आहे. हा दर ४ टक्क्यांच्या खाली आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला दिले होते. ही घट अनपेक्षित असल्याचं इक्रा या पतनिर्धारण संस्थेच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ आदिती नायर यांनी म्हटलं आहे. त्यामुळे पुढच्या महिन्यात होणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत व्याजदरात पाव टक्क्याची

घट होण्याची शक्यता बळावल्याचं त्या म्हणाल्या. जानेवारीत हा दर ४ पूर्णांक २६ शतांश टक्के होता.

**<><><><>**

गंगा नदीला अधिक स्वच्छ बनवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असलेल्या विधानाचा केंद्रीय जल-शक्ती मंत्री सी आर पाटील यांनी आज नवी दिल्ली इथं पुनरुच्चार केला. ते गंगा नदीच्या संवर्धनासाठी नेमलेल्या सक्षम कार्य दलाच्या १४ व्या बैठकीच्या  अध्यक्ष पदावरून बोलत होते.

**<><><><>**

वेव्हज अर्थात World Audio Visual and Entertainment परिषदेच्या पार्श्वभूमीवर उद्या नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी केंद्र सरकारनं एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी वेव्हज परिषदेत उपलब्ध असलेल्या संधींची माहिती यावेळी दिली जाईल. जगभरातल्या १०० हून अधिक देशांचे उच्चायुक्त आणि राजदूत यासाठी आमंत्रित आहेत. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित राहणार आहेत. मुंबईत १ ते ४ मे दरम्यान वेव्हज परिषद होणार आहे.

**<><><><>**

पाकिस्तानात, बलुचिस्तान प्रांतात दहशतवाद्यांनी अपहरण केलेल्या रेल्वेगाडीतल्या प्रवाशांची सुटका करण्याचं काम तिथल्या सुरक्षा दलांनी सुरु केलं आहे. आज दुसऱ्या दिवशीही हे काम सुरूच होत. आत्तापर्यंत १९० प्रवाशांची सुटका करण्यात सुरक्षा दलांना यश आलं आहे. बोलणं जिल्ह्यात बलोच लिबरेशन आर्मी या दहशतवादी संघटनेनं जफर एक्सप्रेस या गाडीचं अपहरण केलं होतं. क्वेट्टा ते पेशावर या मार्गावर धावणाऱ्या या गाडीत ४०० प्रवासी होते.

**<><><><><>**

इटली मधल्या तुरिन इथं सुरु असलेल्या १२ व्या विशेष हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धांच्या पहिल्याच दिवशी  दोन सुवर्ण आणि दोन रजत पदकं पटकावत भारतानं उत्साहवर्धक सुरुवात केली आहे. स्नो बोर्डिंग क्रीडा प्रकाराच्या अंतिम फेरीत समीर यादव आणि भारती यांनी सुवर्ण पदकं तर हेमचंद आणि हर्षिता ठाकूर यांनी रजत पदकं पटकावली. या स्पर्धांमध्ये भारताचे ३०  क्रीडापटु सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

उत्तर काश्मीरमधल्या गुलमर्ग इथं पार पडलेल्या खेलो इंडिया या हिवाळी स्पर्धांच्या दुसऱ्या टप्प्याचीही  आज सांगता झाली. ९ मार्चला सुरु झालेल्या या ४ दिवसीय टप्प्यामध्ये देशभरातल्या  शेकडो क्रीडापटुंसह संरक्षण दलातले जवानही सहभागी झाले होते. लष्कर आणि हिमाचल प्रदेशाच्या खेळांडूंनी यात प्रत्येकी १८, महाराष्ट्राच्या खेळाडूंनी १३ तर जम्मू काश्मिरच्या खेळाडूंनी ४ पदकं मिळवली.